# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.01.2025** **वारःमंगळवार**

---

1. एचएमपीव्ही विषाणूसंसर्गाच्या परिणामी श्वसन विकारांत वाढ झाल्यास ते हाताळण्यास देशातली आरोग्य यंत्रणा सक्षम-आरोग्य मंत्रालयाचा विश्वास
2. नागरिकांनी एचएमपीव्ही विषाणूबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये-मुख्यमंत्री, आणि आरोग्य मंत्र्यांचं आवाहन
3. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या वतीनं पुण्यात उद्यापासून तृणधान्य महोत्सवाचं आयोजन आणि
4. छत्तीसगडमध्ये माओवाद्यांच्या हल्ल्यात 8 जवानांसह 9 जणांचा मृत्यू

**एचएमपीव्ही**

देशात एचएमपीव्ही विषाणूसंसर्गाचे दोन रुग्ण कर्नाटकात आढळल्याच्या वृत्ताला केंद्रिय आरोग्य मंत्रालयानं दुजोरा दिला आहे. तीन आणि आठ महिन्यांच्या दोन बाळांना हा संसर्ग झाला असून दोघांचीही प्रकृती सुधारत आहे तसंच त्यांनी मागच्या काही दिवसांत परदेश प्रवास केलेला नाही असं मंत्रालयानं सांगितलं आहे. फ्लूसदृश किंवा श्वसनाच्या गंभीर आजाराच्या रुग्णसंख्येत देशात कोणतीही अनियमित वाढ झालेली नाही असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

श्वसन विकारांत वाढ झाल्यास ते हाताळण्यास देशातली आरोग्य यंत्रणा सक्षम आहे आणि गरज भासल्यास अतिरिक्त आरोग्य यंत्रणा त्वरित तैनात केली जाऊ शकते असंही मंत्रालयानं सांगितलं.

राज्यातल्या नागरिकांनी कोणत्याही अफवांवर, सोशल मीडियावरच्या योग्य-अयोग्य बातम्यांवर विश्वास ठेवू नये. आरोग्य विभागाच्या सूचनांचं पालन करावं आणि स्वत:ची काळजी घ्यावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे.

राज्यात या संसर्गजन्य विषाणूचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही, असं आरोग्य विभागानं स्पष्ट केलं आहे. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्दी-खोकला रुग्णांचे नियमित सर्वेक्षण अहवाल सादर करावेत असे निर्देश आरोग्य संचालक डॉक्टर नितीन अंबाडेकर यांनी दिले आहेत.

या विषाणूच्या संसर्गाबाबत काय काळजी घ्यावी हे सांगताना पुणे महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉक्टर नीना बोराडे म्हणाल्या……

**पंचायत से पार्लमेंट**

पंचायत राज संस्था गावांच्या विकासासाठी काम करत आहेत. यातून आत्मनिर्भर भारताचं स्वप्न सत्यात येईल असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल केलं. संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात पंचायत से पार्लमेंट या कार्यशाळेचं उद्घाटन बिर्ला यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. 20 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या पंचायत संस्थांमधल्या पाचशे महिला प्रतिनिधी या कार्यशाळेत सहभागी झाल्या आहेत. या महिला प्रतिनिधींनी राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

यांचीही भेट घेतली. भारतीय लोकशाहीचा पाया असलेल्या पंचायत राज संस्थांनी महिला सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**<u>पंतप्रधान रेल्वे</u>**

गेल्या दहा वर्षात भारतीय रेल्वे क्षेत्रात बरेच बदल घडून आले आहेत आणि त्यामुळे भारताची प्रतिमाही बदलली आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पायाभूत सुविधांचं आधुनिकीकरण, प्रवाशांसाठी अत्याधुनिक सोयी, देशातल्या प्रत्येक भागात रेल्वेची सुविधा, यासह रोजगार निर्मिती आणि उद्योगांना पाठबळ या चार मुद्द्यांवर भर देऊन सरकार रेल्वेचा विकास करत आहे असं त्यांनी सांगितलं. देशातल्या विविध रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन काल पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>विमानतळ-मुख्यमंत्री</u>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह नागपूर, शिर्डी विमानतळाचं काम गतीने करून दिलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. राज्यातील सर्व विमानतळाच्या कामासंदर्भात आढावा बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यावेळी उपस्थित होते.

**<u>मुख्यमंत्री-कोल्हापूर</u>**

कोल्हापूर जिल्ह्यात नांदणी इथल्या जैन मठासाठी आवश्यक सोयीसुविधांसह तीर्थक्षेत्राचा अ दर्जा देण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिलं. या मठातल्या पंचकल्याण प्रतिष्ठा महामस्तकाभिषेक सोहोळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सकल जैन समाज आणि स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठ यांच्या वतीनं प्रजागर्क पदवी देण्यात आली.

दरम्यान, स्थानिक आमदारांनी शिरोळ तालुक्यातल्या पूर नियंत्रणाबाबत ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यावर अलमट्टीसाठी समिती स्थापन करण्यात आली असून तिचा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे. आवश्यकता पडल्यास सर्वोच्च न्यायालयात जाऊ असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

**<u>तृणधान्य महोत्सव</u>**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या वतीनं पुण्यात तृणधान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. 8 ते 12 जानेवारी या कालावधीत महोत्सव होणार असून यासाठी राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल उपस्थित राहणार आहेत अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत महोत्सवातल्या पन्नास दालनांमध्ये अस्सल तृणधान्यं आणि त्यापासून निर्मित नाविन्यपूर्ण असंख्य उत्पादनं विक्रीसाठी उपलब्ध असतील.तृणधान्य उत्पादन, तृणधान्यांच्या महत्त्वाबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिकं असे कार्यक्रमदेखील महोत्सवात होणार आहेत.

**<u>हत्या-बीड</u>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या विष्णू चाटे याच्या पोलीस कोठडीत चार दिवसांची तर इतर तीन आरोपीच्या कोठडीत बारा दिवसांची वाढ करण्यात आली आहे.

**<u>पत्रकारदिन</u>**

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन अर्थात पत्रकार दिन काल राज्यात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. पत्रकारांचा सत्कार. व्याख्यान असे कार्यक्रम स्थानिक पत्रकार संघांनी आयोजित केले होते.

**नवरात्र-धाराशिव**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपून आज पहाटे सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. आज दुपारी बारा वाजता घटस्थापनेने शाकंभरी नवरात्र महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

**रेल्वे**

दौंड-सोलापूर-कुर्डूवाडी दरम्यान रेल्वेगाड्यांचा वेग ताशी 110 ते 130 किलोमीटरपर्यंत वाढविण्यासाठी आवश्यक बदल या मार्गावर करण्यात आला आहे. त्याचा लाभ 22 रेल्वे गाड्यांना होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांनी दिली आहे. पुणे रेल्वे स्थानकाच्या दुरुस्तीचं काम 168 कोटी रुपये खर्चानं येत्या काही दिवसात सुरु करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**बालमहोत्सव-सांगली**

सांगली जिल्ह्यात काल चाचा नेहरु बालमहोत्सवाचं उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या हस्ते झालं. जिल्ह्यातल्या 11 बालसुधारगृहांमधली मुलं यात सहभागी झाली आहेत. या बालमहोत्सवाची माहिती देताना जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी वर्षा पाटील म्हणाल्या....

**नक्षलवादी हल्ला**

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी केलेल्या आयइडी स्फोटात 9 जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये 8 सुरक्षा कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दोन दिवसांपूर्वी छत्तीसगडमध्ये तीन जिल्ह्यांत शोधमोहीम राबवून सुरक्षा यंत्रणांनी पाच माओवाद्यांना ठार केलं होतं. ही कारवाई संपवून सुरक्षा कर्मचारी आपल्या तळावर परतत असताना माओवाद्यांनी स्फोट घडवून त्यांचं वाहन उडवलं. यात वाहनातल्या आठ जवानांसह वाहनचालकाचा मृत्यू झाला.

**महिला क्रिकेट संघ**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आयर्लंडसोबतच्या आगामी मर्यादित 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय महिला संघ काल जाहीर केला. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि गोलंदाज रेणुका सिंग यांना विश्रांती देण्यात आली असून स्मृती मानधना भारतीय संघाची कर्णधार असेल. 10 ते 15 जानेवारीदरम्यान राजकोट इथं या मालिकेतले सामने खेळले जाणार आहेत.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील. सकाळी विरळ धुकं पडण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.